# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ३१/०८/२०२६ ( सोमवार )**

---

## प्रतिबंधीत सुगंधित तंबाखुची वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद, ०२ लाख २५ हजार ४८० रूपयांचा मुद्देमाल जप्त केळवद पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन केळवद** :— दिनांक ३०/०८/२०२६ रोजी केळवद पोलीस पेट्रोलींग करीत असतांना गुप्त बातमीदारद्वारे माहिती मिळाली की, महाराष्ट्रात प्रतिबंध असलेला सुगंधित तंबाखुची अवैधरित्या वाहतुक केली जात आहे. अशी माहीती प्राप्त होताच मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण आणि श्री. सागर खर्डे उपविभागिय पोलीस अधिकारी सावनेर विभाग यांच्या मार्गदर्शनात केळवद पोलीसांनी पांढुर्णा ते नागपूर रोडवर बिहाडा फाटयावर येथे सापळा रचत कारवाई केली असता आरोपी नामे केतन संजय पाठक, वय ३० वर्ष, रा. राजु नगर वानाडोंगरी हिंगणा, जि. नागपूर हा चारचाकी कार क्र. एम एच—०२/बी झेड—७६६७ सह मिळुन आला. पंचासमक्ष वाहनाची झडती घेतली असता त्याचेजवळ महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला सुंगधीत तंबाखु मिळुन आला. **पोलीसांनी घटनास्थळावरून पंचासमक्ष प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु एकुण वजन ३१.८११६ किग्रॅ किंमती २५,४८०/— रूपये, चारचाकी कार क्र. एम एच—०२/बी झेड—७६६७ किंमती २,००,०००/— रूपये असा एकुण २,२५,४८०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

नमुद आरोपीने सदर प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु मानवी जिवीतास अपायकारक आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने त्याचे उत्पादन, विक्री, साठा व वाहतुकीवर प्रतिबंध लावलेला आहे हे माहीती असतांना सुध्दा प्रतिबंधीत अन्नपदार्थाची विक्री करण्याच्या हेतुने वाहतूक करताना मिळुन आले. **आरोपी नामे केतन संजय पाठक, वय ३० वर्ष, रा. राजु नगर वानाडोंगरी हिंगणा, जि. नागपूर** याचेविरूद्ध पोस्टे केळवद येथे अन्न सुरक्षा आणि मानके अधि. २००६ सहकलम १२३, २७४, २७५, २२३ भारतीय न्याय संहीता अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

## अस्तित्व लपवुन गुन्हा करण्याच्या उद्देशाने फिरणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद

**पोलीस स्टेशन केळवद :—** दिनांक २९/०८/२०२६ रोजी केळवद पोलीस अवैध धंदयावर कारवाई करणेकामी पेट्रोलींग करीत असता आरोपी मनिष किशोर चंदनकर, वय २८ वर्ष, रा. जटामखोरा, वार्ड क्र. २, ता. सावनेर हा मौजा बिडगाव बस स्टॉप येथे स्वत:चे अस्तित्व लपवुन सुर्यास्तानंतर आणि सुर्योदयाच्या पुर्वी फिरतांना मिळुन आला. त्यास त्याचे नाव व गाव विचारले असता त्याने उडवा उडवीचे उत्तरे दिली. नमुद आरोपी हा दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने वावरतांना मिळुन आल्याने आरोपीचे विरूद्ध कलम १२२ महाराष्ट्र पोलीस अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध २९ गुन्हे नोंद

**दिनांक ३०/०८/२०२६ रोजी मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री. अनिल मस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली नागपूर ग्रामीण पोलिसांनी अवैध दारूविक्री, दारूची साठवणूक करणाऱ्यांविरूद्ध नागपूर ग्रामीण जिल्ह्यात दारूबंदी कायद्यान्वये एकूण २९ गुन्हे दाखल करण्यात आले. यामध्ये अवैध दारूविक्री तसेच दारूची वाहतूक करणाऱ्यांविरुद्धही नियमांनुसार कारवाई करण्यात आली आहे.**

**पोलीस स्टेशन नरखेड** येथे ४ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन जलालखेडा** येथे ०१ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन पारशिवनी** येथे ०६ गुन्हे नोंद. **पोलीस स्टेशन अरोली** येथे २ गुन्हे नोंद. **पोलीस स्टेशन देवलापार** येथे ३ गुन्हे नोंद. **पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी** येथे १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन बोरी** येथे ४ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन कन्हान** येथे १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन केळवद** येथे १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन उमरेड** येथे ६ गुन्हे नोंद.

**नमुद कारवाईत एकुण २६७३० मिली देशी दारू, ४० लिटर मोहाफुल दारू असा एकुण १०९७०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

## विविध पोलीस स्टेशन अंतर्गत अवैध जुगार खेळणाऱ्यांवर ०४ गुन्हे नोंद. एकुण ३३०७०/— रूपयांचा मुद्‌देमाल जप्त

दिनांक ३०/०८/२०२६ रोजी महाराष्ट्र जुगार कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशन यांनी अवैधरित्या ५२ ताशपत्ते जुगार खेळणाऱ्या/खेळविणाऱ्या आरोपीतांवर छापा टाकुन ५२ ताशपत्ते व रोख रक्कम असा एकुण ३३०७०/— रूपयांचा मुद्‌देमाल जप्त केला. महाराष्ट्र जुगार प्रतिबंध अधिनियम अंतर्गत नागपूर ग्रामीण जिल्हयातील विविध पोलीस स्टेशन मध्ये एकुण ०४ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन खापा अंतर्गत** वेगवेगळया ठिकाणी अवैधरीत्या ५२ ताशपत्त्याचा जुगार खेळणाऱ्या आरोपी नामे १) रविंद्र मुरलीधर धुर्वे, वय २५ वर्ष, २) अजय जंगलु मरस्कोल्हे, वय २६ वर्षे, ३) मुकेश मारेती खुंभरे, वय ३१ वर्ष, सर्व रा. उमरी जाभळापाणी, ता. सावनेर हे अवैधरीत्या ५२ ताशपत्त्याचा जुगार खेळताना मिळुन आले. तसेच आरोपी ४) राहुल रमेश मडावी, वय ४८ वर्ष, रा. क्वा.नं.ए/५३ गुमगाव माईन खापा ५) आकाश लिंगेश्वर पाटील, वय ३३ वर्ष, रा. गुमगाव माईन व्हीटीसी खापा हे अवैधरीत्या ५२ ताशपत्त्याचा जुगार खेळताना मिळुन आल्याने एकुण ०५ आरोपीविरूद्ध **०२ गुन्हे नोंद** करण्यात आले. तसेच **पोलीस स्टेशन जलालखेडा** अंतर्गत वेगवेगळया ठिकाणी आरोपी नामे ०१) रूषिकेश दिलीपराव कडु, वय २३ वर्ष, ०२) धनराज अरून घोडेराव, वय ३० वर्ष, ०३) रूपेश पुंडलिकराव वंजारी, वय ३५ वर्ष, तिन्ही रा. तारासावंगी, ता. आष्टी, जि. वर्धा ०४) श्रीकांत हरीहर फोफसे, वय ४० वर्ष, ०५) मंगेश बाबाराव देवताडे, वय ४० वर्ष, दोन्ही रा. अंबाडा सायवाडा ता. नरखेड जि. नागपुर हे अवैधरीत्या ५२ ताशपत्त्याचा जुगार खेळताना मिळुन आले. तसेच आरोपी ०१) अंकीत जगन बिंदीये, वय २६ वर्ष, रा. रानवाडी ०२) विलास मेघराज कुमेरीया, रा. रानवाडी ०३) सचिन बेहनिया, रा. रानवाडी ०४) गुनवंता रामदास सोनवाने, रा. रानवाडी ०५) दिपक मोतीलाल खरपुरीया, रा. रानवाडी ता नरखेड हे अवैधरीत्या ५२ ताशपत्त्याचा जुगार खेळताना मिळुन आल्याने एकुण १० आरोपीविरूद्ध एकुण **०२ गुन्हे** नोंद करण्यात आले.

## अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्यांवर एन.डी.पी.एस कायदयान्वये गुन्हे नोंद

मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण आणि श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक ३०/०८/२०२६ रोजी पोलीस स्टेशन येथे विशेष मोहिम राबवुन अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या ०७ आरोपी यांचेवर कलम २७ एन. डी. पी. एस कायदयान्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन नरखेड** अंतर्गत आरोपी १) नामदेव लक्ष्मण चापेकर, वय ६० वर्ष, रा. खैरगाव, ता. नरखेड २) रमेश संतोष उमाठे, वय ५४ वर्ष, रा. खैरगाव, ता. नरखेड हे मौजा देवळी शेत शिवार येथे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आले. **पोस्टे जलालखेडा अंतर्गत** आरोपी किसना दिवाकर सरवरे, वय ४१ वर्ष, रा. पिंपळधरा, ता. नरखेड हा मौजा दावसा येथे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **पोस्टे पाचगाव अंतर्गत** १) सागर रवींन्द्र हटवार, वय  २१ वर्ष, रा. जुना ज्ञानेश्वर नगर नागपुर २) निखील हिरालाल कुहिके, व २१  वर्ष, रा. विठठ्ल नगर नागपुर हे मौजा धामणा परिसर मेन रोडचे बाजुला सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आले. **पोस्टे पारशिवनी अंतर्गत** आरोपी मोरेश्वर आनंदराव रेवतकर, वय ६० वर्ष, राह. वार्ड क्र. ४, पारशिवनी, ता. पारशिवनी, जि. नागपुर हा मौजा. पारशिवनी तहसील कार्यालय समोर अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. तसेच आरोपी विनोद धनराज रंगारी, वय ४० वर्ष राह. दहेगाव रंगारी, ता. पारशिवनी, जि. नागपुर हा मौजा पारशिवनी ते भागेमाहेरी रोडवरिल भागेमाहेरी टी पॉईट येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. या सर्व आरोपीतांविरूद्ध संबंधित पोलीस स्टेशनला कलम २७ एमडीपीएस कायद्यान्वये गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

**जनसंपर्क अधिकारी**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**